# १. भारतीय पक्ष पद्धतीचे बदलते स्वरूप

१) जोड्या लावा : (राजकीय पक्षांची युती/आघाडी)

| 'अ' (कारकीर्द) | 'ब' (आघाडी सरकार) |
|---|---|
| a) १९९९-२००४ | i) संयुक्त मोर्चा |
| b) १९८९-१९९० | ii) राष्ट्रीय लोकशाही आघाडी |
| c) १९९६-१९९७ | iii) राष्ट्रीय मोर्चा |
| d) २००४-२००९ | iv) संयुक्त पुरोगामी आघाडी |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| १) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| २) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| ३) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| ४) | (ii) | (iii) | (i) | (iv) |

२) जोड्या लावा.

| 'A' | 'B' |
|---|---|
| a) राष्ट्रीय मोर्चा | i) २००४ |
| b) संयुक्त मोर्चा | ii) १९९६ |
| c) एन डी ए | iii) १९८९ |
| d) यु पी ए | iv) १९९७ |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| १) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| २) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| ३) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| ४) | (ii) | (iii) | (i) | (iv) |

३) पुढीलपैकी कोणते वर्णन भारतातील नव्वदीनंतरच्या पक्षपद्धतीचे चपखल वर्णन ठरेल?

१) काँग्रेस व्यवस्था

२) केंद्रात काँग्रेस सरकार व राज्यांमध्ये आघाडीची सरकारे

३) केंद्रात आघाडीचे सरकार व राज्यांमध्ये दोन थवा तीन पक्षांमध्ये सत्ता स्पर्धा

४) केंद्रात आघाडीचे सरकार

४) १९८५ च्या पक्षांतरबंदी कायद्याने :

a) संपूर्ण पक्षांतर बंदी झाली

b) किरकोळ पक्षांतरास आळा घातला गेला

c) ठोक पक्षांतरास मुभा मिळाली

d) सभागृहातील एक तृतीयांश पक्ष सदस्यांच्या पक्षांतरास मुभा

**पर्यायी उत्तरे :**

१) (a), (b), (c) विधाने योग्य आहेत.
२) (b), (c), (d) विधाने योग्य आहेत.
३) (a), (c), (d) विधाने योग्य आहेत.
४) (a), (b) विधाने योग्य आहेत.

५) भारताने राज्यघटनेत ५२ वी घटनादुरुस्ती कोणत्या हेतूने करण्यात आली ?

अ) पक्षांतराला आळा घालणे
ब) मतदाराची वयोमर्यादा ठरविणे
क) निर्वाचन प्रक्रियेत बदल करणे.
ड) निवडणूक आयोग बहुसदस्यीय करणे.

वरीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

१) अ फक्त २) अ आणि ब फक्त ३) अ, ब आणि क ४) अ, ब आणि ड

६) संसद सदस्याच्या राजकीय पक्षाच्या, इतर राजकीय पक्षाशी विलीनीकरणासंदर्भात कोणते विधान बरोबर नाही?

अ) सदर संसद सदस्य ज्या पक्षामध्ये विलीनीकरण झाले आहे, त्या पक्षाचा सदस्य बनतो

ब) जर विलीनीकरण मान्य नसेल, तर सदस्य अपात्र ठरतो

क) निवडणूक आयोग संसदीय पक्षाची मान्यता रद्द करतो

ड) संसदीय पक्षाच्या दोन तृतीयांश सदस्यांनी जर विलीनीकरण मान्य केले, तरच ते घडते

१) अ आणि ब २) फक्त क ३) अ आणि ड ४) ब आणि क

७) **विधान (A)** :उदारमतवादी लोकशाहीत राजकीय पक्ष दलाल म्हणून काम करतात.

**कारण (R)** : हितसंबंधांचे एकत्रीकरण हे राजकीय पक्षांचे सगळ्यात महत्त्वाचे कार्य आहे.

**सांकेतिक पर्याय :**

१) (A) आणि (R) दोन्हीही बरोबर आहेत. (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे.

२) (A) आणि (R) दोन्हीही बरोबर आहेत. (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही.

३) (A) हे बरोबर आहे. (R) हे चूक आहे.

४) (A) हे चुकीचे आहे, पण (R) हे बरोबर आहे.

८) **विधान (A)** : बहुपक्ष पद्धती समाजाचे अधिक चांगले प्रतिनिधित्व करते असे म्हटले जाते.

**कारण (R)** : अनेकतावादापेक्षा, बहुपक्ष पद्धती ही निवडणूक प्रक्रियेचा परिपाक आहे.

**सांकेतिक पर्याय :**

१) (A) आणि (R) दोन्हीही बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे.

२) (A) आणि (R) दोन्हीही बरोबर आहेत. (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही.

३) (A) हे बरोबर आहे पण (R) चुकीचे आहे.

४) (A) हे चुकीचे आहे पण (R) बरोबर आहे

९) ''एका विशिष्ट पक्षाच्या भ्रष्ट आणि अकार्यक्षम शासनाला संधी देण्यापेक्षा अनेक पक्षाच्या आघाडी सरकारचा

**योग्य पर्याय:**

a) उत्तम शासन व संतुलित आर्थिक व्यवस्थापनासाठी

b) राजकीय स्थैर्यासाठी

c) ते अधिक जबाबदार व पारदर्शी असेल

d) ते अधिक लोकशाही व संघीय स्वरुपाचे असे

**पर्यायी उत्तरे :**

१) (a),(b) योग्य पर्याय आहेत २) (a), (b), (d) योग्य पर्याय आहेत

३) (b), (c), (d) योग्य पर्याय आहेत ४) (c), (d) योग्य पर्याय आहेत

## २. राष्ट्रीय पक्ष

**१) विचारप्रणाली आणि संघटन**

**२) सामाजिक आधार आणि पक्षीय निधी**

**३) निवडणुकीतील कामगिरी**

### १) विचारप्रणाली आणि संघटन

१) भारतातील राष्ट्रीय पक्ष म्हणून असलेल्या 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस' पक्षाच्या संघटनेत प्रादेशिक समित्यांवर नियंत्रण ठेवणारी समिती म्हणून खालील समितीचा उल्लेख होतो.

१) प्रदेश काँग्रेस समिती २) कार्यकारी समिती
३) ऑल इंडिया काँग्रेस समिती ४) जिल्हा काँग्रेस समिती

२) 'बसप' हा राष्ट्रीय पक्ष आहे. 'हत्ती' हे या पक्षाचे आरक्षित चिन्ह आहे. मात्र पुढीलपैकी कोणत्या राज्यात 'हत्ती' हे चिन्ह बसपला वापरता येत नाही आणि भारतीय निवडणूक आयोगाच्या खुल्या चिन्हांच्या यादीतून बसपला चिन्ह निवडावे लागते?

१) जम्मू आणि काश्मिर २) केरळ ३) आसाम ४) त्रिपुरा

३) खालील विधाने पहा :

a) राष्ट्रीय पक्ष म्हणून दर्जा मिळवण्यासाठी, निवडणूक आयोगाने, सध्याच्या अटींबरोबरच, २००५ साली अजून एक अट ठेवली, ज्याद्वारे एखाद्या पक्षाला कमीत कमी चार राज्यांमध्ये राज्यस्तरीय पक्ष म्हणून मान्यता मिळायला हवी.

b) कमीत कमी ८ राज्यांमध्ये, एकूण मतदानाच्या ४% मते मिळायला हवीत, अशी आधीची अट होती.

योग्य पर्याय निवडा :

१) (a) बरोबर आहे २) (b) बरोबर आहे
३) (a) आणि (b) दोन्ही बरोबर आहेत. ४) (a) आणि (b) दोन्ही बरोबर नाहीत.

४) भारतातील राजकीय पक्षांच्या बाबतीत खालील विधाने विचारात घ्या :

a) किमान ५ राज्यात राज्य स्तरीय पक्ष म्हणून मान्यता मिळवणाऱ्या पक्षाला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता दिली जाते.

b) एकूण वैध मतांतील राज्यात ८% मते मिळविणाऱ्या पक्षाला राज्यस्तरीय पक्ष म्हणून मान्यता दिली जाते.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहे/त :

१) केवळ (a) २) केवळ (b) ३) दोन्ही ४) एकही नाही

५) खालीलपैकी कोणती विधाने **असत्य** आहेत?

a) निवडणूक आयोगाने राष्ट्रीय जनता दलाला २००७ मध्ये राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता दिली.

b) राष्ट्रीय जनता दलाने त्याकरता आवश्यक अटींची पूर्तता बिहार, झारखंड, मणिपूर आणि मिझोराममधून केली.

c) निवडणूक आयोगाने घातलेल्या अटींची पूर्तता, नंतर झालेल्या निवडणुकांमध्ये राष्ट्रीय जनता दल करू शकले नाही.

d) राष्ट्रीय जनता दलाची राष्ट्रीय पक्ष म्हणून असलेली मान्यता २०१० मध्ये रद्द झाली.

**योग्य** पर्याय निवडा.

१) फक्त (a) २) फक्त (a) आणि (b) ३) (a), (b) आणि (c) ४) वरील सर्व विधाने

६) समाजवादी पक्षाबाबत काय खरे आहे ?

a) समाजवादी पक्ष १९३८ मध्ये काँग्रेस पासून वेगळा झाला.

b) आचार्य नरेंद्र देव हे समाजवादी पक्षाचे संस्थापक अध्यक्ष होते.

c) जयप्रकाश नारायण, एस. एम. जोशी, अशोक मेहता हे समाजवादी पक्ष/प्रजा समाजवादी पक्षाचे नेते होते.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (a), (b) २) फक्त (b), (c)
३) फक्त (a), (c) ४) (a), (b) आणि (c)

७) लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या बाबत काय खरे आहे ?

a) ते काँग्रेस समाजवादी पक्षाचे संस्थापक महासचिव होते.

b) त्यांनी १९६५ साली सक्रिय राजकारणाचा त्याग केला.

c) त्यांनी भूदान आंदोलनात सहभाग घेतला.

d) ते आणीबाणीच्या विरोधाचे प्रतिक होते.

**पर्यायी उत्तरे :**

१) (a), (b) आणि (c)    २) (b), (c) आणि (d)    ३) (a), (c) आणि (d)    ४) (a), (b) आणि (d)

८) बहुजन समाज पक्षाची स्थापना कोणत्या हेतूने करण्यात आली ?

अ) बहुजनांची राजसत्ता निर्माण करणे.

ब) मनुवादी आणि ब्राह्मणवादी जाती व्यवस्थेने निर्मूलन करणे.

क) भारताच्या सांस्कृतिक वारसाचे जतन करणे.

वरीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

१) अ फक्त    २) अ आणि ब फक्त

३) अ, ब आणि क    ४) वरील कोणताही पर्याय योग्य नाही

९) भारतीय जनसंघाची विचारधारा आहेत ?

a) एक देश, एक संस्कृती व एक राष्ट्र विचार

b) व्यक्तिगत स्वातंत्र्या द्वारेच वैभवप्राप्ती शक्य

c) भारताची कार्यालयीन भाषा इंग्रजी ऐवजी हिंदी

d) धार्मिक व सांस्कृतिक अल्पसंख्याकांच्या सवलतीस विरोध.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (a), (b), (c)    २) फक्त (a), (b), (d)

३) फक्त (a), (c), (d)    ४) फक्त (b), (c), (d)

१०) 'कामराज प्लॅन/योजना' म्हणजे काय ?

१) सर्व वरिष्ठ काँग्रेसजनांनी आपल्या पदाचा राजीनामा देऊन तरुण पक्ष कार्यकर्त्यांसाठी मार्ग मोकळा करावा.

२) सर्व वरिष्ठ काँग्रेसजनांनी एकत्र व्हावे आणि इंदिरा गांधींना विरोध करावा.

३) सर्व वरिष्ठ काँग्रेसजनांनी आपल्या हृदयाचे शब्द ऐकावे आणि व्ही. व्ही. गिरी यांना मतदान करावे.

४) सर्व वरिष्ठ काँग्रेसजनांनी तरुण पक्ष कार्यकर्त्यांना सल्ला द्यावा.

## २) सामाजिक आधार आणि पक्षीय निधी

१) खालीलपैकी कोण स्वतंत्र पक्षाचे नेते नव्हते ?

१) सी. राजगोपालाचारी    २) मिनू मसानी    ३) पी. सी. जोशी    ४) के. एम. मुन्शी

२) **योग्य** कथने ओळखा :

a) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना १८८५ मध्ये झाली.

b) भारतीय जनता पार्टीची स्थापना १९८० मध्ये झाली.

c) राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना १९९९ मध्ये झाली.

d) भारतीय साम्यवादी पक्षाची स्थापना १९३० मध्ये झाली.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (a), (b), (c)    २) फक्त (a), (b), (d)    ३) फक्त (b), (c), (d)    ४) वरील सर्व

३) खालील विधाने वाचा व अचूक पर्याय निवडा.

a) भारतावरील चीनच्या आक्रमणाचा पार्श्वभूमीवर कम्युनिस्ट पक्षात फूट पडली.

b) भारत धार्जिण्या कम्युनिस्टांना उजवे तर चीन धार्जिण्या कम्युनिस्टांना डावे असे संबोधले जाऊ लागले.

c) महाराष्ट्रात उजव्या कम्युनिस्टांचे नेते कॉ. रणदिवे तर डाव्या कम्युनिस्टांचे नेते कॉ. डांगे होते.

d) कालांतराने डावे कम्युनिस्ट काँग्रेसच्या जवळ गेले, उजवे कम्युनिस्ट मात्र कायम काँग्रेसच्या विरोधात राहिले.

**पर्यायी उत्तरे :**

१) सर्व विधाने सत्य आहेत. २) विधाने (c) आणि (d) असत्य आहेत.

३) विधाने (b) आणि (c) असत्य आहेत. ४) विधाने (b) आणि (d) असत्य आहेत.

४) प्रत्येक राज्यव्यवस्थेतील राजकीय पक्षाचा सामाजिक संदर्भ निरनिराळा असतो. साम्यवादी पक्षांच्या बाबतीत खालील वाक्य कोणत्या गटात तंतोतंत लागू होतात ?

a) साम्यवादी पक्ष बेकायदेशीर

b) साम्यवादी पक्षाची स्थापना करण्यास कायदेशीर बंदी नाही.

c) क्रांतीचा अग्रदूत

d) एकाच पक्षाच्या अनेक शाखा

देशांच्या गटाच्या खाली दिलेल्या पर्यायापैकी कोणता पर्याय वरील (a), (b), (c), (d) यांच्याशी अनुक्रमे साधर्म्य सांगतो.

१) इंग्लंड, अमेरिका, भारत, चीन २) अमेरिका, चीन, भारत, इंग्लंड

३) अमेरिका, इंग्लंड, चीन, भारत ४) चीन, अमेरिका, भारत, इंग्लंड

## ३) निवडणुकीतील कामगिरी

१) खालीलपैकी कोणत्या लोकसभा निवडणुका काँग्रेस वर्चस्वाचा ऱ्हास दर्शवितात?

१) १९८९, १९९१ आणि २००४ २) १९७७, १९८० आणि १९८४

३) १९६७, १९७७ आणि २००४ ४) १९६७, १९७७ आणि १९८९

२) कोणत्या वर्षाच्या लोकसभा निवडणुकीत एका मतदारसंघात ११२ उमेदवार उभे होते व त्या मतदारसंघाची मतपत्रिका वर्तमानपत्राएवढी होती?

a) १९७७ b) १९८० c) १९८४ d) १९८९

**पर्यायी उत्तरे :**

१) (a) आणि (c) पर्याय योग्य आहेत. २) (b) पर्याय योग्य आहेत.

३) (d) पर्याय योग्य आहेत. ४) वरीलपैकी कोणतेही नाही

३) भारतातील प्रमुख राष्ट्रीय पक्ष असलेल्या (B.J.P.) भा.ज.पा. पक्षाच्या १९९८ मध्ये १३ महिने टिकलेल्या सरकारला निवडणूकीत खालील संख्येत जागा मिळाल्या होत्या.

१) २९७ २) १६१ ३) १८० ४) १७०

४) पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत पुढीलपैकी कोणता पक्ष दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा पक्ष म्हणून निवडून आला?

१) समाजवादी पक्ष २) किसान मजदूर प्रजा पक्ष

३) भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि त्याचे मित्र पक्ष ४) जन संघ

५) पुढीलपैकी कोणत्या राजकीय पक्षाने १९७७ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाबरोबर युती केली?

a) भारतीय कम्युनिस्ट पक्ष b) अखिल भारतीय अण्णा द्र. मु. क.

c) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष d) द्रविड मुन्नेत्र कळघम

**पर्यायी उत्तरे :**

१) (a) व (b) २) (c) व (d) ३) (a) व (c) ४) (b) व (d)

६) २००४ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकामध्ये काँग्रेसला १४५ जागा मिळाल्या व त्यांच्या मित्रपक्षांना ७४ जागा मिळाल्या. ही बेरीज देखील बहुमतापेक्षा कमी होती त्यावेळी कोणत्या राजकीय पक्षाच्या 'बाहेरून' पाठिंब्याच्या जोरावर संयुक्त पुरोगामी आघाडीने अल्पमतातील सरकार स्थापन केले?

a) भारतीय कम्युनिस्ट पक्ष b) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष

c) तृणमूल काँग्रेस d) राष्ट्रीय जनता दल

**पर्यायी उत्तरे :**

१) (a) आणि (c)     २) (b) आणि (d)     ३) (a) आणि (b)     ४) (c) आणि (d)

७) २०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने पुढीलपैकी कोणत्या राजकीय पक्षाबरोबर निवडणूक समझोता केला **नव्हता?**

a) द्रविड मुन्नेत्र कळघम     b) तृणमूल काँग्रेस     c) तेलुगू देसम पार्टी

d) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी     e) राष्ट्रीय जनता दल     f) झारखंड मुक्ती मोर्चा

**पर्यायी उत्तरे :**

१) (a), (e) आणि (f)     २) (a), (c) आणि (d)     ३) (d), (e) आणि (f)     ४) (a), (b), (c) आणि (d)

८) पुढीलपैकी कोणती विधाने योग्य आहेत?

a) मार्च १९६७ च्या विधानसभा निवडणुकांमध्ये केरळ विधानसभेत साम्यवादी पक्षाने सर्वाधिक जागा जिंकल्या.

b) इ. एम. एस. नंबुद्रीपाद हे भारतीय साम्यवादी पक्षाचे उमेदवार केरळचे मुख्यमंत्री बनले.

c) लोकशाही निवडणुकांतून सत्तेत आलेले हे जगातील पहिलेच साम्यवादी पक्षाचे शासन होते.

**पर्यायी उत्तरे –**

१) (a), (b), (c)     २) (a), (b)     ३) (b), (c)     ४) (a), (c)

९) अयोग्य कथन ओळखा :

१) १९५१ मध्ये साम्यवादी पक्षाने रक्तरंजित क्रांतीच्या मार्गाचा त्याग केला आणि सार्वत्रिक निवडणुकीत सहभागी होण्याचा निर्णय घेतला.

२) ए.के. गोपाल, एस.ए. डांगे, अजय घोष हे साम्यवादी पक्षाचे (CPI) नेते होते.

३) १९६४ मध्ये साम्यवादी पक्ष दोन गटात विभागला गेला (CPI) ने चीनचे समर्थन केले आणि CPI(M) ने रशियाचे समर्थन केले.

४) ब्रिटिशांना त्याच्या नाझी जर्मनी विरोधातील लढ्याला पाठिंबा देण्याचे साम्यवाद्यांनी १९४१ साली ठरवले.

## ३. प्रादेशिक पक्ष

**१) विचारप्रणाली आणि संघटन**

**२) सामाजिक आधार आणि पक्षीय निधी**

**३) निवडणुकीतील कामगिरी**

### १) विचारप्रणाली आणि संघटन

१) खाली नमूद केलेल्या भारताच्या राजकीय पक्षांमध्ये त्यांच्या स्थापनेसंदर्भात योग्य कालानुक्रम कोणता आहे?

a) द्र. मु. क.     b) साम्यवादी पक्ष (मार्क्सवादी)     c) आसाम गण परिषद     d) तेलुगू देसम पक्ष

१) (a), (b), (d), (c)     २) (a), (b), (c), (d)     ३) (b), (a), (d), (c)     ४) (d), (c) ,(b), (a)

२) २०१४ मध्ये, भारतीय निवडणूक आयोगाने खालीलपैकी कोणत्या पक्षांना महाराष्ट्रात राज्य पक्ष म्हणून मान्यता दिली आहे?

a) शेतकरी कामगार पक्ष     b) शिवसेना     c) महाराष्ट्र नवनिर्माण सेना

d) जन सुराज्य पक्ष     e) भारतीय कम्युनिस्ट पक्ष

**योग्य** पर्याय निवडा.

१) (a), (b) आणि (c)     २) (a), (b) (c) आणि (e)     ३) (b), (d) आणि (e)     ४) (b) आणि (c)

३) पुढीलपैकी कोणता पक्ष केवळ एका धार्मिक समुदायाच्या आधारे उभा आहे?

१) शिरोमणी अकाली दल     २) तेलुगू देसम पार्टी

३) हरियाणा काँग्रेस     ४) झारखंड मुक्ती मोर्चा

४) जोड्या लावा.

| **पक्षाचे वर्गीकरण** | **प्रादेशिक पक्ष** |
|---|---|
| a) प्रादेशिक आकांक्षांवर | i) शिरोमणी अकाली दल |
| b) वांशिकतेवर आधारित | ii) आसाम गण परिषद |
| c) धार्मिकतेवर आधारित | iii) राष्ट्रीय जनता दल |
| d) व्यक्तिमत्त्वावर आधारित | iv) द्रविड मुनेत्र कळघम |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| १) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| २) | (iv) | (i) | (iii) | (ii) |
| ३) | (i) | (iii) | (ii) | (iv) |
| ४) | (iii) | (iv) | (ii) | (i) |

५) अखिल भारतीय तृणमूल काँग्रेसला राज्य पातळीवरील पक्ष म्हणून पुढीलपैकी कोणत्या राज्यात मान्यता आहे?

१) पश्चिम बंगाल व ओडिशा
२) पश्चिम बंगाल व मेघालय
३) पश्चिम बंगाल व आसाम
४) पश्चिम बंगाल व त्रिपुरा

६) घटकराज्यातील मान्यताप्राप्त पक्ष असा दर्जा प्राप्त होण्यासाठी खालीलपैकी महत्त्वाच्या अटी पुढीलप्रमाणे:

a) तो पक्ष ५ वर्षापासून सतत राजकीय कार्य करत असावा.
b) पक्ष प्रमुख उच्च राजघराण्याशी संबंधित असावा.
c) अस्तित्वात असलेल्या लोकसभेत २५ पैकी १ व विधानसभेत दर ३० पैकी १ सभासद निवडून गेलेला असावा.
d) लोकसभेत पक्षाची एक स्त्री-उमेदवार निवडून गेलेली असावी.

**पर्यायी उत्तरे :**

१) केवळ विधान (a) बरोबर आहे
२) (b) व (c) ही विधाने बरोबर आहेत
३) (a) व (c) ही विधाने बरोबर आहेत
४) वरीलपैकी एकही नाही

७) सिक्कीम प्रश्नाबाबत खालीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत?

a) सिक्कीम विधानसभेच्या १९७४ च्या पहिल्या लोकशाही निवडणुका सिक्कीम काँग्रेसने जिंकल्या.
b) काझी लेंडूप दोर्जी खांगसरपा हे सिक्कीम प्रजा मंडळाचे संस्थापक होते.
c) काझी लेंडूप दोर्जी खांगसरपा यांनी १९६२ मध्ये सिक्कीम राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना केली.
d) भारतीय संघराज्याचे सिक्कीम हे २३ वे राज्य बनले.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (a), (b), (d)
२) फक्त (a), (c), (d)
३) फक्त (b), (c), (d)
४) फक्त (a), (b), (c)

८) खालील विधाने पहा.

a) भारताच्या निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील ६ पक्षांना स्थानिक पक्ष म्हणून मान्यता दिली आहे.
b) दूरदर्शनवरील राजकीय प्रक्षेपणाकरिता उपलब्ध कालावधी पक्षांच्या राष्ट्रीय अथवा राज्य पक्ष म्हणून असलेल्या मान्यतेवर आधारित असतो.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहेत?

१) फक्त (a)
२) फक्त (b)
३) (a) आणि (b) दोन्ही
४) (a) किंवा (b) दोन्ही नाही

## २) सामाजिक आधार आणि पक्षीय निधी

१) जोड्या लावा (प्रादेशिक आकांक्षा)

**'अ' (व्यक्ती/संघटना) 'ब' (राज्य)**

| | |
|---|---|
| a) अंगामी झापू फिझो | i) सिक्कीम |
| b) लालडेंगा | ii) नागालँड |
| c) काझी लेहंडुप दोर्जी खांगसपा | iii) मिझोराम |
| d) आसू | iv) आसाम |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| १) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| २) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| ३) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| ४) | (i) | (iii) | (ii) | (iv) |

२) खालीलपैकी कोणते विधान **बरोबर नाही?**

a) राज ठाकरे यांनी २७ नोव्हेंबर, २००५ रोजी शिवसेनेचा राजीनामा दिला.

b) राज ठाकरे यांनी ९ मार्च, २००६ रोजी 'महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची' स्थापना केली.

c) महाराष्ट्र विधानसभा निवडणूक, २००९ मध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने ९.८% मते प्राप्त केली.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (a) २) फक्त (b) ३) फक्त (c) ४) वरीलपैकी नाही

३) सारखेच निवडणूक चिन्ह असलेल्या राजकीय पक्षाच्या चार जोड्या खाली दिल्या आहेत :

a) ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक, महाराष्ट्रवादी गोमांतक

b) शिवसेना, झारखंड मुक्ती मोर्चा

c) तेलगू देसम, जनता दल (संयुक्त)

d) केरळ काँग्रेस (एम), ऑल इंडिया अण्णा द्रविड मुनेत्र कळघम (ए आय ए डी एम के)

वरीलपैकी कोणते पर्याय **बरोबर** आहेत?

१) फक्त (a), (c) २) फक्त (b), (c), (d) ३) फक्त (a), (c), (d) **४) फक्त (a), (b), (d)**

४) जोड्या लावा – (राजकीय पक्षांचे निवडणूक

| **'अ' (राजकीय पक्ष)** | **'ब' (निवडणूक चिन्ह)** |
|---|---|
| a) ऑल इंडिया मजलीस ए इत्तेहादुल मुसलमीन | i) छताचा पंखा |
| b) तेलंगणा राष्ट्र समिती | ii) सायकल |
| c) तेलगू देसम | iii) कार |
| d) युवाजन श्रमिक रायतू काँग्रेस पार्टी | iv) पतंग |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| १) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| २) | (i) | (iii) | (ii) | (iv) |
| ३) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| ४) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

## ३) निवडणुकीतील कामगिरी

१) शिवसेनेला २००९ आणि २०१४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत अनुक्रमे किती जागा जिंकता आल्या?

१) ११ आणि १५ २) ९ आणि १८ ३) ११ आणि १८ ४) १० आणि १७

२) २००९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुका संदर्भात, स्तंभ II मधील जिंकलेल्या जागांच्या संख्येबरोबर स्तंभ I मधील राजकीय पक्षांच्या जोड्या जुळवा.

| *I – राजकीय पक्ष* | *II* |
|---|---|
| a) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | i) ४६ |
| b) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ii) ६२ |
| c) भारतीय जनता पक्ष | iii) ८२ |
| d) शिवसेना | iv) ४४ |

**योग्य** पर्याय निवडा.

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| १) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| २) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| ३) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| ४) | (i) | (iii) | (iv) | (ii) |

३) महाराष्ट्र नवनिर्माण सेनेबाबत खालील विधाने विचारात घ्या :

a) महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्थापना ९ मार्च २००६ मध्ये झाली.

b) २०१२ च्या नाशिक महापालिका निवडणुकीत या पक्षाने ६३ जागा जिंकल्या.

c) २००९ च्या विधानसभा निवडणुकीत या पक्षाने १३ जागा जिंकल्या.

d) २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत या पक्षाने ३ जागा जिंकल्या.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

१) (a) आणि (b) २) (b), (c) आणि (d) ३) (a) आणि (c) ४) (a), (b) आणि (c)

४) आम आदमी पक्षाच्या (आप) संदर्भात खालील विधाने विचारात घ्या :

a) आपची स्थापना २०१२ मध्ये झाली.

b) २०१३ च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत पहिल्या क्रमांकाचा पक्ष म्हणून आप पुढे आला.

c) २०१५ च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत आपने ७० पैकी ६८ जागा जिंकल्या.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

१) फक्त (a) २) (b) आणि (c) ३) (a) आणि (c) ४) फक्त (c)

५) २००९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांमध्ये, खालील राजकीय पक्षांची सर्वात जास्त ते सर्वात कमी मतांची टक्केवारी, यानुसार मांडणी करायची झाल्यास, खालीलपैकी कोणता पर्याय **योग्य** ठरेल?

१) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (INC), राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (NCP), शिवसेना (SS), भारतीय जनता पार्टी (BJP)

२) NCP, INC, BJP, SS

३) INC, NCP, BJP, SS

४) INC, SS, NCP, BJP

६) १५ व्या लोकसभेच्या संदर्भात, प्रादेशिक पक्ष, प्रभावक्षेत्र राज्य आणि पक्षाचा प्रमुख नेता याचे **अचूक** उत्तर सांगाः

१) भारतीय राष्ट्रीय लोकदल – हरियाणा – ओमप्रकाश चौटाला

बिजू जनता दल – बिहार – लालू प्रसाद यादव

झारखंड मुक्ती मोर्चा – झारखंड – रामपाल यादव

२) भारतीय राष्ट्रीय लोकदल – राजस्थान – वसुंधरा राजे सिंधिया
बिजू जनता दल – ओरिसा – नवीन पटनायक
झारखंड मुक्ती मोर्चा – बिहार – नितीश कुमार

३) भारतीय राष्ट्रीय लोकदल – हरियाणा – अजित सिंह
बिजू जनता दल – ओरिसा – ओमप्रकाश चौटाला
झारखंड मुक्ती मोर्चा – बिहार – शरद यादव

४) भारतीय राष्ट्रीय लोकदल – उत्तर प्रदेश – अजित सिंह
झारखंड मुक्ती मोर्चा – बिहार – शिबू सोरेन
बिजू जनता दल – ओरिसा – नवीन पटनायक

७) पुढीलपैकी कोणता राजकीय पक्ष १९८४ च्या लोकसभा निवडणुकांनंतर सर्वात मोठा विरोधी पक्ष म्हणून निवडून आला?
१) मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी २) भारतीय कम्युनिस्ट पार्टी
३) तेलुगू देसम पार्टी ४) द्रविड मुन्नेत्र कळघम

## ४. महाराष्ट्रातील प्रमुख हितसंबंधी गट

१) महाराष्ट्रात साधारणपणे किती प्रकारचे दबावगट आढळून येतात ?
१) ०१ २) ०५ ३) ०३ ४) १०

२) सूची अ व सूची ब मधील जोड्या जुळवा :

| **सूची (अ)** | **सूची (ब)** |
|---|---|
| a) भारतीय जनता पक्ष | i) इंडियन नॅशनल ट्रेड युनियन कॉंग्रेस |
| b) भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ii) ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेस |
| c) भारतीय साम्यवादी पक्ष | iii) भारतीय कामगार सेना |
| d) शिवसेना | iv) भारतीय मजदूर संघ |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| १) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| २) | (i) | (iii) | (iv) | (ii) |
| ३) | (ii) | (iv) | (iii) | (i) |
| ४) | (iii) | (ii) | (i) | (iv) |

३) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाबरोबर पुढीलपैकी कोणती विद्यार्थी संघटना संलग्न आहे ?
१) अखिल भारतीय विद्यार्थी परिषद २) ऑल इंडिया स्टूडंटस फेडरेशन
३) नॅशनल स्टूडंटस युनियन ऑफ इंडिया ४) प्रोग्रेसिव्ह स्टूडंटस युनियन

४) खालीलपैकी कोणती राज्ये नक्षलवाद्याच्या प्रबळ प्रभावाखाली आहेत?
१) आसाम, प. बंगाल आणि मध्य प्रदेश २) आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड
३) आंध्र प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात ४) मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि गुजरात

५) कोणत्या सरकारच्या कालखंडात 'एक उद्योग एक संघटना' असे घोष वाक्य बनविले गेले?
१) कॉंग्रेस सरकार २) जनता दल सरकार
३) राष्ट्रवादी कॉंग्रेस सरकार ४) जनता पक्ष सरकार

६) मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हे ब्रीदवाक्य कोणत्या संघटनेशी संबंधित आहे?

१) बहिष्कृत हितकारणी सभा
२) दलित शोषित समाज संघर्ष समिती
३) समता सैनिक दल
४) फुले-आंबेडकर विचार मंच

७) शेतकरी कामगार पक्षाची पाळेमुळे कोणत्या चळवळीत दिसून येतात ?

१) सत्यशोधक चळवळ
२) लोकहितवादी चळवळ
३) ब्राह्मणेतर चळवळ
४) भूदान चळवळ

वरील पर्यायांपैकी योग्य ते निवडा :

१) (a) आणि (b) २) (b) आणि (c) ३) (c) आणि (d) ४) (a) आणि (c)

८) पुढीलपैकी कोणते विधान राजकीय पक्ष व हितसंबंधी गटांच्या परस्पर संबंधाबद्दल बिनचूक वर्णन करणारे आहे?

a) हितसंबंधी गट त्या त्या विशिष्ट सामाजिक गट वा हितसंबंधाशी संबंधित मुद्दे व मागण्या उपस्थित करतात. राजकीय पक्ष या मागण्यांचा योजना व धोरणे निश्चित करण्यासाठी व राजकीय भूमिका घेण्यासाठी वापर करतात.

b) हितसंबंधी गट व दबाव गट राजकीय पक्षांचे मार्गदर्शन म्हणून भूमिका बजावतात व पक्षांसाठी राजकीय भरतीचे कार्य करतात.

c) हितसंबंधी गटांनी प्रगटीकरण केलेल्या मागण्यांचे सुसूत्रीकरण करताना राजकीय पक्षांना विविध व बऱ्याच वेळा परस्परविरोधी हितसंबंधामधील तोल राखावा लागतो.

d) हितसंबंधी गट राजकीय पक्षांचा वापर स्वतःच्या उद्दिष्ट्य पूर्तीसाठी करून घेतात.

**पर्यायी उत्तरे :**

१) (a) व (b)
२) (b) व (c)
३) (a), (b) व (c)
४) वरीलपैकी सर्व पर्याय बरोबर आहेत.

९) पुढील विधानांचा अभ्यास करा :

a) पारंपारिक व सामाजिक गटांनी लोकशाही संस्थांच्या कार्यप्रणालीसाठी सामाजिक आधार उपलब्ध करून दिला आहे.

b) जात, भाषा, धर्म व प्रादेशिक अस्मितांनी आपल्या मागण्या मांडून सोयीची धोरणे व सोयी-सुविधा मिळविण्याच्या दृष्टीने दबाव देण्यासाठी लोकशाहीवादी राजकारणाचा वापर केला आहे.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त?

१) केवळ (a) बरोबर आहे.
२) केवळ (b) बरोबर आहे.
३) (a) व (b) दोन्ही बरोबर आहेत.
४) (a) व (b) दोन्ही बरोबर नाहीत.

१०) पुढीलपैकी कोणते पर्याय दबाव गटाची कार्ये वर्णन करतात?

a) शासन आणि जनता यांतील दुवा
b) हितसंबंधाचे अभिव्यक्तीकरण
c) हितसंबंधाचे सुसूत्रीकरण
d) राजकीय सहभाग वाढवणे

**पर्यायी उत्तरे –**

१) (a), (b), (c), (d) २) (a), (b), (d) ३) (a), (b), (c) ४) (a), (c), (d)


## THIS SAMPLE IS OVER

To buy complete MPSC Mains GS II course click on the link below -
https://www.studycircleonline.com/notes/GSII-Indian-Polity-and-Constitution-/153
To buy complete MPSC Mains course incusive of the complete syllabus click on the link below-
https://www.studycircleonline.com/courses/mpsc-mains-20-21-complete-course-/13
or visit www.studycircleonline.com